महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३०४ वा | दिनांक : ०२/१०/२०२५ | वार : गुरूवार

## अजित पवार आणि शरद पवारांची भेट : राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण



**मुंबई** : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते शरद पवार यांची आज भेट घेतली आहे. वाय. बी चव्हाण सेंटरमध्ये दोघांची भेट झाल्याचे समजते. तसेच दोघांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाल्याची माहिती आहे. माळेगाव साखर कारखान्यासंदर्भात ही भेट झाल्याचे अजित पवारांनी सांगितले आहे.

शरद पवार यांच्या भेटीनंतर अजित पवारांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, आदरणीय पवार साहेब शिवनगर विद्या प्रसारक मंडळ जे आमच्या माळेगावचे आहे त्याचे अध्यक्ष आहेत. मागेच तिथल्या सभासदांनी त्यांना केले आहे आणि तिथे जी बॉडी आहे त्यात माळेगाव साखर कारखान्याचा चेअरमन हा त्या बॉडीवर वाइज चेअरमन म्हणून येतो, अशी ती घटना आहे. त्यामुळे ती निवडणूक झाल्यानंतर त्यासंदर्भातील जी बैठक होती, त्यासाठी मी आलो होतो.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, विश्वस्त मंडळ नेमायची जबाबदारी ही अध्यक्षांची असते. आमचे 6 गट आहेत, त्या सहा गटातील एक एक प्रतिनिधी घ्यायचा असतो. आपल्याला माहीत आहे की वार्षिक सभा सगळ्या चालू आहेत. वार्षिक सर्वसाधारण सभेची देखील तारीख ठरवायची होती, वेळ ठरवायची होती आणि बाकीचे एकंदरीत जे काही ॲडमिशन झाले आहेत त्या संदर्भात ही बैठक झाली. पूरग्रस्तांच्या संदर्भात प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले, जे काही मोठे संकट आले आहे त्यांना सर्व प्रकारची मदत झाली पाहिजे आणि त्यानुसार सरकार उपाययोजना करत आहे.

अजित पवार आणि शरद पवार यांच्यात याआधी देखील विविध कारणास्तव भेटी झाल्या आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या फुटीनंतर दोन्ही नेते याआधीदेखील अनेकदा भेटले आहेत. पण त्या भेटी कुठल्यातरी कार्यक्रमाच्या निमित्ताने झाल्या आहेत. परंतु, आजची ही भेट ही ठरवून झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. त्यात आगामी महानगरपालिका आणि स्थानिक निवडणुका देखील असल्याने या भेटीला अधिक महत्त्व आले आहे.

दरम्यान, राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी अजित पवार हे सध्या दौऱ्यावर आहेत. विविध भागांतील शेतकऱ्यांच्या बांधावर जात त्यांनी पाहणी केली असून त्यानुसार तातडीने मदतीच्या उपाययोजना देखील करण्याचे निर्देशही त्यांच्याकडून देण्यात आले आहेत.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची लगबग

**मुंबई** : दिवाळीनंतर लगेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा धुराळा उडण्याची शक्यता आहे. राज्यातील 32 जिल्हा परिषदा व त्या अंतर्गतच्या 336 पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्यपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी 13 ऑक्टोबर 2025 रोजी सोडत काढण्यात येणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केली आहे.

संबंधित जिल्हाधिकारी 10 ऑक्टोबर 2025 रोजी वृत्तपत्रांत आरक्षण सोडतीसंदर्भातील सूचना प्रसिद्ध करतील. 13 ऑक्टोबर 2025 रोजी सोडत काढल्यानंतर प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर 14 ते 17 ऑक्टोबर 2025 या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून 3 नोव्हेंबर 2025 रोजी शासन राजपत्रात अंतिम आरक्षण प्रसिद्ध केले जाईल.

असा आहे आरक्षणाचा कार्यक्रम

- 6 ऑक्टोबर 2025 पर्यंत - अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीकरिता जागा निश्चित करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव तयार करून विभागीय आयुक्तांकडे सादर करणे.
- 8 ऑक्टोबर 2025 पर्यंत - अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीकरिता राखीव जागांच्या प्रस्तावास मान्यता देणे.
- 10 ऑक्टोबर 2025 - आरक्षण सोडतीची सुचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे. (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील व सर्वसाधारण महिलांसहबाबत)
- 13 ऑक्टोबर 2025 - जिल्हा परिषद गटासाठी व पंचायत समिती गणासाठी आरक्षण सोडत.
- 14 ऑक्टोबर 2025 - प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिध्द करणे.
- 14 ते 17 ऑक्टोबर 2025 - जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील प्रारूप आरक्षणावर हरकती व सुचना सादर करण्याचा कालावधी.
- 27 ऑक्टोबरपर्यंत प्राप्त प्रारूप आरक्षणावरील हरकती व सुचना आधारे अभिप्रायासह गोषवारा विभागीय आयुक्त यांना सादर करणे.
- 3 नोव्हेंबर 2025 रोजीपर्यंत प्रारूप आरक्षणावर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून आरक्षण अंतिम करणे.
- 3 नोव्हेंबर 2025 रोजी अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे.




## दसऱ्याच्या पूर्वसंध्येलाच मनोज जरांगेंची तब्येत बिघडली

**छत्रपती संभाजीनगर** : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची दसऱ्याच्या पूर्वसंध्येलाच तब्येत अचानक बिघडल्याची बातमी समोर येत आहे. त्यांना तातडीने छत्रपती संभाजीनगरमधील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज जरांगे यांना व्हायरल तापाचा त्रास होत असल्याचे समोर आले आहे. यामुळे मनोज जरांगे हे नारायण गडावरील दसरा मेळाव्याला राहणार की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मनोज जरांगे जरांगे पाटील यांची तब्येत बिघडल्याने उद्या, दसऱ्याच्या दिवशी नारायण गडावर होणाऱ्या त्यांच्या महत्त्वपूर्ण मेळाव्यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. मात्र, मनोज जरांगे यांनी स्वतः यावर स्पष्टीकरण दिले आहे. तब्येत बरी नसली तरी ते उद्याच्या दसरा मेळाव्याला नारायण गडावर जाण्यावर ठाम असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. मी ॲम्ब्युलन्समधून जाईन, पण दसरा मेळाव्याची परंपरा मोडणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे, आजारी असूनही मनोज जरांगे पाटील मेळाव्याला हजर राहणार असल्याचे निश्चित झाले आहे.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत मोठे उपोषण केले होते आणि त्यांच्या या आंदोलनाला मोठे यश मिळाले. याच आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर काढला. राज्यात हैदराबाद गॅझेट लागू झाल्यानंतर मनोज जरांगे यांचा हा पहिलाच दसरा मेळावा आहे. सध्या राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी असे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील उद्याच्या मेळाव्यात काय बोलतात, आरक्षणाच्या पुढील वाटचालीची कोणती दिशा ठरवतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०२ ऑक्टोबर २०२५

# दसरा

चैतन्य उधळीत
दिवस उगवला हसरा
उत्सव आनंदाचा
घेवून आला दसरा

रांगोळी शोभे अंगणी
झेंडूचे तोरण दारी
स्नेहभाव वाढवूनी
कटुता विसरूया सारी

आपट्याची पानं
सोनं म्हणून लुटूया
सुख-समाधाण
एक दुसऱ्याला वाटूया

श्रीरामाचा आदर्श घेवूनी
अहंकाराचा करूया नाश
एकतेचा मंत्र जपूनी
तोडूया विषमतेचे पाश

आदराने नमस्कार करूनी
थोरांना देवूया मान
आम्हा सदा अभिमाण

**रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# मिलिंद कुलकर्णी आणि राम वाघमारे यांना सेवानिवृत्ती निरोप





**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयातील कार्यालयीन अधीक्षक श्री. मिलिंद कुलकर्णी हे नियत वयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाले. मागील महिन्यात शिक्षकेतर कर्मचारी श्री. राम वाघमारे हे सुद्धा सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा आज सपत्नीक सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यवस्थापन मंडळाचे श्री. अरुणजी अग्रवाल, प्राचार्य कविता प्राशर यांची उपस्थिती होती. याप्रसंगी श्री. विजय लोणकर, प्रा. संदीप पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ.भगवानसिंग डोभाळ, डॉ. कालिदास सूर्यवंशी यांनी मिलिंद कुलकर्णी आणि राम वाघमारे यांच्या कार्यकर्तुत्वासंदर्भात विचार व्यक्त केले.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून मिलिंद कुलकर्णी आणि वाघमारे यांनी कार्यालयीन कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावली. मिलिंद कुलकर्णी हे कार्यालय अधीक्षक या पदापर्यंत ते पोहोचले. यावेळी मिलिंद कुलकर्णी आणि राम वाघमारे या दोघांनीही विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, महाविद्यालयामुळे आम्हाला ओळख मिळाली.

आम्हाला नेमून दिलेले कार्य आम्ही जबाबदारीपूर्वक पार पाडले. महाविद्यालयातील वातावरण हे कौटुंबिक स्वरूपाचे होते. आपण सर्वांनी दिलेले प्रेम हे आम्हाला आयुष्यभर जगण्यासाठी बळ देणार आहे. प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनी मिलिंद कुलकर्णी आणि राम वाघमारे यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी केलेल्या कामगिरीबद्दल गौरवोद्गार काढले.

श्री. अरुणजी अग्रवाल यांनीही याप्रसंगी शुभेच्छा दिल्यात. यावेळी मोठ्या संख्येने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा. राजक्रांती वलसे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# पहिली हीच शेवटची संधी समजून त्याचे सोने करा : अजय बोरसे




छत्रपती संभाजीनगर : "जीवनाच्या प्रत्येक वळणावर पहिली हीच शेवटची संधी समजून जीवतोड मेहनत घ्या, कष्ट उपसा , रात्रीचा दिवस करून स्वप्नाचे , संधीचे सोने करा" असे प्रतिपादन अजय बोरसे यांनी व्यक्तिमत्व विकास व रोजगाराच्या संधी व्याख्यानात केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या उद्‌घाटन प्रसंगी व्यक्तिमत्व विकासावर बोलतांना महाबॅक ग्रामीण रोजगार प्रशिक्षण संस्थेचे संचालक अजय बोरसे यांनी शिक्षण, उद्योग , व्यवसाय व स्पर्धा परीक्षा यातील स्वानुभव कथन करत विविध यश व अपयशाच्या गाथा सांगत विद्यार्थ्यांना सकारात्मकता व सचोटी व सातत्य हीच यशस्वी जीवनाची गुरूकिल्ली असल्याचे स्पष्ट केले. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ.नवनाथ गोरे यांनी केले , अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. आर. व्ही. मस्के यांनी प्रत्येक प्रसंगाला तोड देत , संघर्ष करणाऱ्यांचीच इतिहासात दखल घेतली जाते , प्रवाहा विरूद्ध जो पोहतो , वागतो व कार्य करतो तोच नायक ठरतो. समाजही त्यांचाच गौरव करतो असे विचार व्यक्त केले. यावेळी हिंदी पंधरवड्या निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील हिन्दी विभागात झालेल्या वक्तृत्व स्पर्धेतील रू.पाच हजाराचे तृतीय क्रमांक मिळवणार्या महाविद्यालयाचा विद्यार्थी आदित्य इंगळे याचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.एस. पी.खिल्लारे,डॉ.व्ही. जी. पिंगळे, डॉ. प्रा. आर. बी. घोडे, प्रा. अशोक बारगजे , डॉ.प्रज्ञा रुईकर साळवे,डॉ.पूजा वडमारे, डॉ. गणेश खिल्लारे, डॉ.विजय आडे, डॉ.राजीव वानखडे, डॉ.प्रेमराज वाघमारे,.सतीश वाघमारे, डॉ. समाधान वाघमारे, डॉ. अकुलवार , डॉ. गौतम घाडगे, डॉ.ज्योती केदारे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिपा गायकवाड यांनी तर आभार उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडे यांनी केले.


# प्रथम पुण्यस्मरण



**स्व. श्री शेखअमीनुद्दीन शेख दगडूभाई**
**(नळणीकर)**
**(मृत्यू: 1/10/2024)**
**रहिवासी: एन -11 यादव नगर सिडको**
**(छ. संभाजीनगर)**

**समस्त शोकाकुल**

**डॉ. शेख अलिमुद्दीन (मुलगा)**
**शेख अझीमुद्दीन (मुलगा)**
**शेख नसिरुद्दीन शेख दगडूभाई (भाऊ)**
**शेख नज्मुद्दीन शेख दगडूभाई (भाऊ)**
**समस्त शेख, पटेल आणिदेशमुख परिवार**
**(नळणीकर) नाती आणि नातवंडे**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०२ ऑक्टोबर २०२५


# उल्लेखनीय यश




**छत्रपती संभाजीनगर :** आयुक्त तथा प्रशासक महोदय मा . श्री . जी . श्रीकांत सर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या " आम्हाला खेळू द्या " या उपक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शासन शालेय रायफल व पिस्टल शूटिंग क्रीडा स्पर्धेत केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय , मुकुंदवाडीच्या विद्यार्थ्यांनी अकरा पदके घेऊन उत्तुंग कामगिरी करीत यश संपादन केले आहे .

स्पर्धेतील निकाल अंडर 14 बॉईज यश डोंगरे – कास्यपदक अंडर 14 गर्ल्स सायली हिवाळे – सुवर्णपदक अंशिका – रौप्यपदक खुशी एकलहरे – कास्यपदक अंडर 17 बॉईज राहुल गवळी – सुवर्णपदक अश्वजीत जाधव – रौप्यपदक ◦ अंडर 17 गर्ल्स पूर्वा जोगदंड – सुवर्णपदक वैष्णवी कोकणे – कास्यपदक ◦ अंडर 19 बॉईज फरान अब्दुल्ला – कास्यपदक ◦ अंडर 19 गर्ल्स मयुरी नाथभजन – रौप्यपदक दिव्या डोंगरे – कास्यपदक

या यशामागे केंद्रीय मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी सर यांचे प्रेरणादायी नेतृत्व तसेच क्रीडा शिक्षक इरफान सय्यद सर, दीपक महानवर सर यांचे परिश्रम , मेहनत आणि उत्कृष्ट मार्गदर्शन यांचा मोठा वाटा आहे.

श्री . अंकुश पांढरे सर ( उपआयुक्त , शिक्षण विभाग ) श्री . गणेश दांडगे सर ( नियंत्रण अधिकारी ) श्री . संजू प्रसाद बालया सर ( मनपा क्रीडा अधिकारी ) श्री . ज्ञानदेव सांगळे सर ( समग्र शिक्षण अभियान कार्यक्रमाधिकारी ) श्री . भरत तीनगोटे सर ( शिक्षण अधिकारी ) सहशिक्षक सचिन गायकवाड सर यांनी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या .

# राजीव गांधी महाविद्यालयात भास्कर चंदनशिव यांना भावपुर्ण श्रद्धांजली






**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे थोर ग्रामीण साहित्यिक भास्कर चंदनशिव यांच्या दुःखद निधनामुळे मराठी विभागाच्या वतीने शोक सभा आयोजित केली होती.


या सभेत मराठी विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी त्यांच्या "लाल चिखल" या कथेचे वर्णन करताना ही कथा म्हणजे शेतकऱ्यांच्या पिकाला भाव न मिळाल्यावर त्याच्या संसाराचा कसा चिखल होतो याचे विश्लेषण केले.

भास्कर चंदनशिव सरांचे साहित्य म्हणजे ग्रामीण जीवनाचा आरसाच असा त्यांनी उल्लेख केला.हे साहित्य आजच्या यंत्रयुगाच्या काळातही जसे तसे लागू पडते असे ते म्हणाले. यावेळी मनोज देवकर यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस एस मुळे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुखदेव पोटदुखे यांनी केले तर आभार प्रा. हरिदास होळकर यांनी मांडले. सुरुवातीला सर्व विदयार्थी व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी दोन मिनिट उभे भास्कर चंदनशिव यांना श्रद्धांजली वाहिली. या कार्यक्रमासाठी डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ. कालिदास फड, डॉ. नरेश डहाळे, डॉ. लक्ष्मण दांडगे, डॉ. ललित गोल्डे, डॉ. नानासाहेब लावंड,डॉ. इम्रान पठाण, प्रा. खरात डॉ.राऊत, डॉ. नितीन मुळे, डॉ. चव्हाण आदी उपस्थित होते,




रिपब्लिकन सेनेच्या औरंगाबाद शहरप्रमुख पदी नितीन वाकेकर यांची निवड झाल्या बद्दल सत्कार करताना पाणी प्रश्नाचे अभ्यासक डॉ.किशोर सूर्यवंशी, सोबत दैनिक महाराष्ट्र जनशक्ती चे मुख्य संपादक प्राचार्य डॉ हसन इनामदार


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०२ ऑक्टोबर २०२५


# बापू

मारून ही मरले का? सांगा कधी बापू?
गोळ्यांना ही वधले का? कधी कुठं बापू?

सत्याच्या प्रयोगाचं, स्थान नेमकं बापू
माणसाच्या मनातलं, गूज नेमकं बापू.

तथागताच्या अहिंसेचं, पान मानाचं बापू
सत्य शिव अन् सुदंराचं, गान ईश्वरी बापू.

चरख्यात विणलेला, धागा जनात बापू
'चले जावचा' नारा, घुमतो मनात बापू.

'खेड्याकडे चला' ही धाव भाबडी बापू?
खेड्याची राय आता, गेली लयास बापू?

शाळा बंद, दारू चालू, डाव नवाच बापू
गांधीवाद पचला कुठं, मायभूमीत बापू.

रामराज्याचं स्वप्नं रुसलं, स्वप्नांवरच बापू
तुमची काठी चष्मा हरता, देश पोरका बापू.

जगात गाजावाजा जरी, रोज तुमचा बापू
प्रेम आमचे नोटे पुरते, बाकी ढोंग बापू.

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**

# शिवाजी महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे उदघाटन




**कन्नड : (प्रतिनिधी )** येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे या शैक्षणिक वर्षातील उदघाटन संत तुकाराम महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी डॉ. सुधीर पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. (ता. १) कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. बी . के . मगर होते. व्यासपीठावर नॅक समन्वयक डॉ. विजय मातकर, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. आर.के. पवार, डॉ. संजय भालेराव यांची उपस्थिती होती. यावेळी व्यक्तिमत्व विकास व युवक या विषयावर डॉ. सुधीर पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी व्यक्तिमत्व म्हणजे काय ? व्यक्तिमत्वाचे प्रकार, व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक गुण ? संवाद कौशल्ये, आदी विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते. आजीवन शिक्षण व विस्तार सेवा केंद्राच्या उपक्रमात सहभागी होवून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक विकासाबरोबरच आपला व्यक्तिमत्व विकास साधून जीवनात यशस्वी व्हावे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर यांनी केला. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नियमित महाविद्यालयात आले पाहिजे. अभ्यासाबरोबरच महाविद्यालयातील उपक्रमात सहभाग घेतला पाहिजे. सामाजिक जाणिवेचा व सामाजिक बांधिलकीचा माणूस घडविण्यासाठी हे विभाग महत्वाचे योगदान देत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. रामचंद्र झाडे यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. या विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली. सहकार्यक्रम अधिकारी डॉ. आर.के. पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कनिष्ठ महाविद्यालयातील मुलांचा संघ व्हॉलिबॉल स्पर्धेत प्रथम



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारत शिक्षण संस्था संचलित मुरूम येथील कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा मुलांचा संघ प्रथम क्रमांक पटकावला , एकुरगा येथे संपन्न झालेल्या 19 वर्षाखालील तालुकास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेत मुलांचा संघ दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला व जिल्हास्तरावर निवड झाली याबद्दल संघाचा कौतुक व अभिनंदन करण्यात आले यावेळी भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अमोल भैया मोरे, उपाध्यक्ष अश्लेष भैया मोरे सचिव पद्माकरराव हराळकर शालेय समितीचे अध्यक्ष त्र्यंबक इंगोले प्राचार्य गोविंद इंगोले व क्रीडा शिक्षक बालाजी इंगोले, आदींनी विजेते टीम सुमित मुळजे, शुभम जाधव, आशिष घोडके, प्रतीक करंगळे ,समर्थ घोडके ,रोहन पवार ,किरण कनमुसे ,चंद्रकांत सुतार ,कार्तिक हारके ,अमर राठोड ,उदय राठोड, पियुष वाघदरे ,या सर्व खेळाडूचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०२ ऑक्टोबर २०२५


## कृष्णा शिंदे यांची जि.प.कन्या प्रशाला औरंगपुराच्या मुख्याध्यापक पदी निवड



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद कन्या प्रशाला औरंगपुरा येथील मुख्याध्यापक वर्ग-2 पदी प्रशालेचे शारीरिक शिक्षक श्री.कृष्णा शिंदे यांची श्रीमती जयश्री चव्हाण शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी नियुक्ती केली आहे.

त्यांच्या निवडीबद्दल ललिता मगरे, दादासाहेब गजहंस, माजी मुख्याध्यापक सीमा बेगम, सायरा शेख, दादाराव गायकवाड, चेतना तायडे, मनीषा कोळी, ज्योती पवार, आयशा बेगम,तुषार चव्हाण,संपदा शिंदे, स्वप्नील लोखंडे यांनी अभिनंदन केले आहे.






# नागपूर हुन वसुंधरा पायी दिंडीचे रत्नागिरीकडे प्रस्थान



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** वसुंधरा पायी दिंडीचे प्रस्थान रत्नागिरी मधील श्री क्षेत्र नानिजधामकडे पायी चालत सुरू झाले आहे. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांची प्रेरणा घेऊन या पायी दिंडी सोहळ्यामध्ये हजारो भाविक सहभागी झाले आहेत. महाराष्ट्रातून आणि इतर राज्यातून देखील अशाच प्रकारच्या दिंड्या रामानंदचार्य दक्षिणपीठ नानिजधाम कडे प्रस्थान करणार आहेत. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा 21 ऑक्टोबर 2025 रोजी 59 वा वाढदिवस येत आहे. या दिवशी ही दिंडी नाणीजधाम येथे पोहोचणार आहे.

या दिंडीच्या माध्यमातून ग्लोबल वॉर्मिंग या विषयावर प्रकाश टाकला जात आहे. निसर्गाचे संरक्षण आणि जतन कसे करावे, आपल्या परिसरामध्ये स्वच्छता कशी ठेवावी याबद्दलची जागरूकता करत आहेत. सर्व भाविक निसर्ग संरक्षणाचे फलक हातात घेऊन संदेश देत आहेत. या दिंडीमध्ये सर्व वयोगटातील भाविक सहभागी झाले आहेत. भाविकांना कुठलाही शारीरिक त्रास झाला तर प्रथमोपचारासाठी ॲम्बुलन्सची व्यवस्था दिंडीच्या व्यवस्थापनाने केली आहे.

तसेच या दिंडी मध्ये शासनाने राबवलेल्या एक पेड मा के नाम या योजने अंतर्गत वृक्षारोपण करत आहोत.आज आपण बघतच आहोत वेळोवेळी पाऊस पडणे पूरस्थिती निर्माण होणे याला कारणीभूत आपण आहोत म्हणून वृक्षारोपण करून निसर्गाची जीवनसृष्टी चे संरक्षण करणे त्यासाठी आपण हे वृक्षारोपण करत आहोत जगद्गुरु रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी यांची प्रेरणा घेऊन या पायी दिंडी सोहळ्यामध्ये हजारो भाविक सहभागी झाले आहेत. ही दीडी मोहगाव झिलपी नागपूर येथुन दि ११/०८/२०२५ रोजी निधाली व महाराष्ट्रातून आणि इतर राज्यातून देखील अशाच प्रकारच्या दिंड्या जगतगुरुश्री रामानंदचार्य पीठ नानिजधाम कडे प्रस्थान करणार आहेत. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा 21 ऑक्टोबर 2025 रोजी 59 वा वाढदिवस येत आहे. या दिवशी ही दिंडी नाणीजधाम येथे पोहोचणार आहे.

जागरूकता करत आहेत. सर्व भाविक निसर्ग संरक्षणाचे फलक हातात घेऊन संदेश देत आहेत. या दिंडीमध्ये सर्व वयोगटातील भाविक सहभागी झाले आहेत. भाविकांना कुठलाही शारीरिक त्रास झाला तर प्रथमोपचारासाठी ॲम्बुलन्सची व्यवस्था दिंडीच्या व्यवस्थापनाने केली आहे. तसेच या दिंडी मध्ये शासनाने राबवलेल्या एक पेड मा के नाम या योजने अंतर्गत वृक्षारोपण करत आहोत.आज आपण बघतच आहोत वेळोवेळी पाऊस पडणे पूरस्थिती निर्माण होणे याला कारणीभूत आपण आहोत म्हणून वृक्षारोपण करून निसर्गाची जीवनसृष्टी चे संरक्षण करणे त्यासाठी आपण हे वृक्षारपण करत आहोत.

तसेच आज प्रयत्न जगतगुरुश्री च्या बोधातुन १४६ देहदान व आवयव दान ५६ झाले आहेत तसेच आज पर्यत लाखो लोकानी व्यसन मुक्ती झाली.ही दिंडी दि.११/०९/२०२५ रोजी मोहगाव झिलपी नागपुर ,हुन नाणीजधाम ला निघाली तसेच सिमुरगवाहन हुन नाणीजधाम, नाशिक ते नाणीजधाम, तेलगना ते नाणीजधाम, पुणे ते नाणीजधाम, मुंबई ते नाणीजधाम, गोवा ते नाणीजधाम आसे ऐकुन ७ ठिकाण हुन निघून ते नाणीजधाम ला २१/०९/२०२५ पर्यत पोहोचणार आहेत.

# श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयात सेवापूर्ती सत्कार सोहळा



**उमरगा :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयात व्यवसाय विभागातील, क्रॉप सायन्स विषयाचे पूर्ण वेळ शिक्षक प्रा. सुभाष गणपती कदम हे 2 जुलाई 1993 पासून श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत होते, 32 वर्ष तीन महिने अशा प्रदीर्घ सेवेनंतर ते 30 सप्टेंबर 2025 रोजी सेवानिवृत्त झाले,सेवा गौरव पूर्तीच्या निरोप समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री प्रभाकररावजी (तात्या) हिरवे हे उपस्थित होते, कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन व दीप प्रज्वलन करून झाले, कार्यक्रमाच्या निरोप समारंभाला, मा.अविनाश पाटील सर, मा.अभयकुमारजी हिरास सर,प्रा.डॉ.आर.एन. निगडे सर, व मा.मालखरे सरांनी शुभेच्छा देऊन त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला, त्यानंतर त्यांचा मुलगा डॉ. शारंधर कदम यांनी आपल्या वडिलांबद्दल भावनात्मक उद्गार काढले, सत्कार ला उत्तर देताना प्राध्यापक सुभाष कदम यांनी विद्यार्थी कसे घडविले तसेच गावाप्रति सर्व जाती धर्माच्या लोकाप्रती आदरभाव व्यक्त केले, व मी सुखी व समाधानी होऊन मी सेवानिवृत्त होत आहे असे संबोधले.

या घडीला माझ्या मनात कुणाबद्दलही आकस ,राग द्वेष नाही.माझ्या संपूर्ण कारकिर्दीमध्ये माझ्यावर सर्वांनी भरभरून प्रेम केले आहे,त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे असे भावनिक उद्गार काढले.

अध्यक्षीय समारोप करताना माझी प्राचार्य गोरख घोडके यांनी प्रा.सुभाष कदम सरांच्या एकूणच सेवेबद्दल संपूर्ण आढावा घेऊन त्यांच्या आयुष्यातील महत्वाच्या टप्प्यांविषयी विशेष माहिती देऊन गौरवोद्गार काढले.

एक हाडाचा शिक्षक,हमेशाकरता सेवा देणारा शिक्षक, विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून भावी आयुष्याबद्दल सदिच्छा दिल्या, कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे मा .रत्नाकरजी पतंगे सर, संस्थेचे उपसचिव मंदाकिनी ताई पाटील, मा.एस .एस .पवार, मा.वसंतराव गाडीवाले, कानेगावचे सरपंच मा.नामदेव लोभे, कानेगावचे पोलीस पाटील श्रीमान सुखराज पाटील, श्रीमान लक्ष्मणजी पतंगे सर, माजी नायब तहसीलदार श्री सुधाकररावजी मोरे साहेब उपस्थित होते.

या कार्यक्रमाबरोबरच कनिष्ठ लिपिक श्रीमान मोहन घाटे यांचाही निरोप समारंभ याचवेळी अतिउत्साहात संपन्न झाला, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नागेशजी रामदासी सर यांनी केले व आभार प्रा.मारुती खमितकर यांनी व्यक्त केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री अविनाशजी पाटील सर, श्री.खंडू म्हेत्रे सर, श्री.सुरेंद्र ढंगे सर , श्री अविनाशजी राखेलकर सर, श्री.इंद्रजीत शिंदे इत्यादींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०२ ऑक्टोबर २०२५

# अहिंसा : भारतीय तत्त्वज्ञानाची मानवतेला दिलेली शाश्वत देणगी

मानवजातीच्या उत्क्रांतीचा इतिहास पाहिला तर त्यात वैचारिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय अशा विविध प्रवाहांची सतत धारा वाहताना दिसते. या प्रवाहांनी मानवाला कधी संघर्ष दिला, कधी विकासाची संधी दिली, तर कधी त्याला अध:पतनाच्या मार्गावर नेले. परंतु या साऱ्या गोंधळातही काही शाश्वत मूल्ये अशी आहेत की त्यांनी मानवतेला टिकवून ठेवले, जीवनाला अर्थ दिला आणि समाजाला योग्य दिशा दिली. या मूल्यांमध्ये अहिंसा हे भारतीय तत्त्वज्ञानाचे जगाला आणि मानवतेला दिलेली सर्वांत मोठी शाश्वत देणगी आहे. हिंसेच्या आगीमध्ये जळणाऱ्या मानवतेला अहिंसा हा शीतल झरा आहे. म्हणूनच २ ऑक्टोबर हा दिवस, जो महात्मा गांधींच्या जन्मदिनानिमित्त 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरा केला जातो, तो केवळ गांधीजींच्या स्मृतीपुरता मर्यादित नसून भारतीय विचारसंपदेच्या गौरवाचे प्रतीक आहे.

अहिंसेची कल्पना भारतात नवी नाही. 'अहिंसा परमो धर्म:' हा विचार लोकांच्या आचार-विचारात रूजलेला होता. पण अहिंसेला सर्वाधिक सुस्पष्ट रूप आणि दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनविले ते बौद्ध आणि जैन तत्त्वज्ञानाने. या दोन परंपरांनी अहिंसेला केवळ धार्मिक उपदेश न ठेवता ती सामाजिक, नैतिक आणि वैयक्तिक जीवनाच्या प्रत्येक पातळीवर आचरणात आणली आहे. भगवान बुद्धांनी करुणा, मैत्रीभावना आणि समत्व यांच्या माध्यमातून अहिंसेला मानवी जीवनाचा पाया बनविला, तर भगवान महावीरांनी अहिंसेला सर्वोच्च व्रत मानले. त्यामुळे भारताची ही देणगी केवळ एका देशापुरती मर्यादित राहिली नाही, तर तिने संपूर्ण जगाच्या वैचारिक इतिहासाला घडविले.

भगवान गौतम बुद्धांच्या शिकवणीत अहिंसेला करुणा आणि मैत्रीभावनेच्या माध्यमातून केंद्रस्थानी ठेवण्यात आले. बुद्धांनी मानवी जीवनातील दु:खाचे मूळ अज्ञान, लोभ आणि द्वेषात शोधले. त्यांनी सांगितले की प्रत्येक जीव दु:ख टाळण्याची इच्छा करतो; त्यामुळे कोणत्याही जीवाला दु:ख देणे ही सर्वांत मोठी हिंसा आहे. बुद्धांच्या पंचशीलांमध्ये पहिला नियम किंवा शील आहे ते म्हणजे 'प्राण्यांचा जीव घेणार नाही'. हा नियम केवळ हत्या न करण्यापुरता मर्यादित नाही, तर इतरांना त्रास देणार नाही, शोषण करणार नाही, दास्य स्वीकारणार नाही, असेही त्याचे व्यापक स्वरूप आहे.

बुद्धांच्या अष्टांगिक मार्गात सम्यक दृष्टी, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका ही सर्व अंग अहिंसेशी थेट जोडलेली आहेत. खोटे बोलणे, कटु वाणी वापरणे, परनिंदा करणे, लोभ, मत्सर, क्रोध या सर्व मानसिक हिंसा आहेत. त्यामुळे बुद्धांनी मन, वाणी आणि कृती या तिन्ही स्तरांवर करुणा आणि मैत्री विकसित करण्यावर भर दिला. बौद्ध परंपरेतील 'मैत्रीभावना ध्यान' म्हणजे अहिंसेचेच एक सुंदर व्यावहारिक रूप आहे. या ध्यानात साधक स्वत:साठी आणि सर्व प्राणिमात्रांसाठी शुभेच्छा व्यक्त करतो 'सर्व प्राणी सुखी होवोत, सर्व प्राणी निरोगी राहोत, सर्व प्राणी शांततेत नांदोत'. या प्रक्रियेतून मनातील द्वेष, राग, मत्सर नाहीसे होऊन करुणा, प्रेम आणि सहजीवनभाव निर्माण होतो.

बुद्धांच्या शिकवणीचा समाजावर फार मोठा परिणाम झाला. त्याकाळी प्रचलित असलेल्या प्राण्यांच्या बलिदानांच्या प्रथा, जातीभेद, दास्यप्रथा यावर मोठ्या प्रमाणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. आशियातील चीन, जपान, श्रीलंका, थायलंड, कोरिया या देशांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला आणि त्यासोबतच अहिंसेचा विचारही सर्वत्र रुजला. त्यामुळे अहिंसा ही केवळ भारतीय मूल्य न राहता संपूर्ण आशियाई संस्कृतीचा आधारस्तंभ ठरली.

तसेच जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांनी अहिंसेला जीवनाचा केंद्रबिंदू मानला. त्यांच्या मते प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येक आत्मा शुद्ध, शाश्वत व समान आहे. त्यामुळे कोणत्याही जीवाला दुखविणे म्हणजे स्वत:च्या आत्म्यावरच आघात करणे होय. महावीरांनी पाच महान व्रते सांगितली — अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. यामध्ये अहिंसा हे सर्वोच्च व्रत मानले जाते, कारण त्याशिवाय इतर व्रतांचे अस्तित्वच अशक्य आहे. जैन आचारसंहितेनुसार अहिंसा केवळ हत्या टाळणे एवढीच मर्यादित नाही, तर ती विचार, वाणी आणि कृती या तिन्ही स्तरांवर आचरली जाणारी संपूर्ण जीवनपद्धती आहे.

जैन साधू-साध्वींनी आचरलेली अहिंसा इतकी सूक्ष्म आहे की ती पाहून जग थक्क होते. चालताना एखादा कीटक चिरडला जाणार नाही याची दक्षता घेणे, पाणी गाळून पिणे, रात्री न चालणे, जमिनीवर बसताना सूक्ष्म जीवांना इजा होणार नाही यासाठी पायाखाली कापड पसरवणे ही त्यांच्या जीवनातील वास्तव उदाहरणे आहेत. इतकेच नव्हे तर ते वाणीतील कटुता, विचारांतील वैरभाव यांनाही हिंसा मानतात. गृहस्थांसाठीही महावीरांनी अहिंसेचा उपदेश केला. जाणूनबुजून कोणत्याही सजीवाला त्रास न देणे, व्यापारात फसवणूक न करणे, इतरांच्या संपत्तीवर डोळा न ठेवणे, कुटुंबात संयम व करुणा पाळणे ही गृहस्थांची अहिंसा ठरते.

जैन तत्त्वज्ञानाद्वारे अहिंसेच्या वैचारिक विस्ताराचे दर्शन घडवतात. सत्य एकांगी नसते; ते विविध दृष्टीकोनांतून समजावे लागते. त्यामुळे इतरांचा विचार नाकारणे, त्यांना चुकीचे ठरविणे, आपलेच सत्य अंतिम मानणे ही एक प्रकारची मानसिक हिंसा ठरते. तसेच प्रत्येक विधान सापेक्ष आहे, ते 'अमुकदृष्ट्या सत्य' असते. त्यामुळे वादविवादात अडेलतट्टूपणा टाळून संवाद साधणे, परस्पर सहिष्णुता बाळगणे हेही अहिंसेचेच रूप आहे. अशा प्रकारे जैन परंपरेने अहिंसेला जीवनाच्या प्रत्येक अंगात विस्तार दिला.

या दीर्घ परंपरेला आधुनिक काळात नवे परिमाण दिले ते महात्मा गांधींनी. गांधीजींनी अहिंसेला केवळ वैयक्तिक चारित्र्याची गोष्ट न मानता सामाजिक व राजकीय संघर्षाचे प्रभावी साधन बनवले. त्यांनी सांगितले की सत्यासाठी लढताना अहिंसा हाच सर्वोत्तम मार्ग आहे. ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लढताना महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाच्या माध्यमातून अहिंसेचा उपयोग केला. त्यांनी दाखवून दिले की शस्त्र न उचलता देखील साम्राज्याला गुडघे टेकवता येतात. महात्मा गांधीजींच्या या प्रयोगाने जगातील अनेक नेत्यांना प्रेरणा दिली. मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला, दलाई लामा यांसारख्या नेत्यांनी अहिंसेच्या मार्गाने सामाजिक परिवर्तन घडवून आणले. संयुक्त राष्ट्रसंघाने महात्मा गांधीजींच्या जन्मदिनी म्हणजेच २ ऑक्टोबर रोजी, 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' घोषित करून या भारतीय विचारधारेचे जागतिक महत्त्व अधोरेखित केले.

आजच्या युगात अहिंसेचे महत्त्व अधिकच वाढले आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाला अवकाशाचा वेध घेता आला, संगणक व कृत्रिम बुद्धिमत्ता निर्माण करता आली, पण त्याचबरोबर युद्ध, दहशतवाद, अण्वस्त्रांची शर्यत, पर्यावरणाचा ऱ्हास, सामाजिक असमानता यांसारख्या समस्या अधिकच तीव्र झाल्या. मानवी लोभामुळे पृथ्वीचे संतुलन धोक्यात आले आहे. हिंसा केवळ रणांगणावर नव्हे तर विचारांमध्ये, वाणीमध्ये आणि समाजरचनेतही वाढताना दिसते. अशा वेळी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाची देणगी असलेली अहिंसा हीच मानवतेचा खरा आधार ठरते. अहिंसा म्हणजे केवळ युद्ध टाळणे नाही, तर अहिंसा म्हणजे पर्यावरणाचा विध्वंस न करणे, प्राण्यांवर अनावश्यक अत्याचार न करणे, महिलांवर व दुर्बलांवर होणारी हिंसा थांबवणे, जातीय, धार्मिक वा वांशिक भेदभाव दूर करणे, सामाजिक व आर्थिक अन्यायाला अहिंसात्मक मार्गाने आव्हान देणे. जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात विचार, वाणी आणि कृती या तिन्ही स्तरांवर अहिंसा पाळली, तर समाजात शांतता, प्रेम व सहजीवनाचे वातावरण निर्माण होईल.

अहिंसा ही केवळ उपदेशाची गोष्ट न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरली पाहिजे. बौद्ध आणि जैन परंपरांनी दिलेली करुणा व मैत्रीभावना, गांधीजींनी दिलेला सत्याग्रहाचा मार्ग आणि संयुक्त राष्ट्रसंघाने अहिंसेला दिलेली जागतिक मान्यता या सर्व गोष्टी आपल्याला आठवण करून देतात की अहिंसा हीच भविष्यातील मानवतेची तारणहार आहे. हिंसा विध्वंस घडवते, तर अहिंसा सृजन करते. हिंसा द्वेष वाढवते, तर अहिंसा मैत्री निर्माण करते. हिंसा मृत्यू पसरवते, तर अहिंसा जीवनाचा उत्सव साजरा करते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त आपण सर्वांनी हे स्मरण केले पाहिजे की, जर मानवतेचे भविष्य सुरक्षित, उज्ज्वल आणि शांततामय करायचे असेल, तर अहिंसा हीच जीवनपद्धती म्हणून स्वीकारावी लागेल. हे केवळ भारताचेच नव्हे तर संपूर्ण जगाचे कर्तव्य आहे. अहिंसा ही भारतीय तत्त्वज्ञानाची मानवतेला दिलेली शाश्वत देणगी आहे आणि हीच देणगी आपल्याला उज्ज्वल उद्याच्या दिशेने नेणारी आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**ईमेल —**
**bagate.rajendra5@gmail.com**